MHRT080000352022

**नियमीत दिवाणी दावा क्रमांक १९/२०२२ मधील**
**निशाणी क्र.२१ खालील आदेश**

१. सदरचा दावा प्रतिवादींविरुध्द निरंतरची ताकीद मिळविणेकरीता दाखल केलेला आहे. प्रस्तुतचा अर्ज हा वादी क्र. १ व २ तर्फे प्रतिवादींचा प्रतिदाव्यावर कैफियत देणेकामी त्यांच्याविरुध्द झालेला 'कैफियत नाही' असा आदेश रद्द करणेत यावा या करिता केलेला आहे. अर्ज व त्यावरील म्हणणे यांचे अवलोकन केले. वादीतर्फे वकील श्रीमती गिडये व प्रतिवादी तर्फेवकील यांचा युक्तीवाद ऐकला.

२. वादींच्या वकीलांनी असा युक्तीवाद केला की, वादी क्र. १ व २ यांना मुलकी खात्यातून आवश्यक ती कागदपत्रे वेळेत उपलब्ध न झाल्यामुळे त्यांना प्रतिदाव्यावर कैफियत देता आली नाही. सबब वादींची कैफियत ते आज रोजी ` न्यायालयात दाखल करीत आहेत. सदरची कैफियत स्विकारली न गेल्यास वादींना त्यांच्या हक्कापासुन कायमस्वरुपी मुकावे लागणार असून पैशाच्या स्वरुपात कधीही भरुन न काढता येणारे अपरिमित नुकसान होणार आहे. याउलट प्रतिवादींना सदरच्या कैफियतीवर त्यांचे म्हणणे सादर करण्याची पुरेपुर संधी मिळणार आहे. त्यामुळे त्यांच्या विरुध्द पारीत झालेला कैफियत नाहीचा आदेश रद्द करण्यात यावा अशी विनंती करण्यात आली.

३. प्रतिवादीने प्रस्तुत अर्जास म्हणणे दाखल केले आहे. प्रतिवादींनी असे कथन केले आहे की सदरच्या अर्जात नेमकी कुठली कागदपत्रे मिळाली नाहीत यांचा उल्लेख नाही. सबब अर्ज विनाकारण असून तो नामंजूर करण्यात यावा.

४. अर्ज पाहिला. अर्जातील कथने पाहिली त्यावर आलेले म्हणणे पाहिले. वादीने नि. २१ च्या पुष्टयर्थ नि. २२ येथे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. दिवाणी प्रक्रिया संहितेनुसार प्रत्येक अर्जात गुणदोषावर चौकशी होणे न्यायाचे दृष्टीने आवश्यक असते. अशा चौकशीसाठी पक्षकाराचे म्हणणे दाखल होणे व त्यांची योग्य बाजु मांडणे हे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक असते. त्यामुळे न्यायाच्या दृष्टीने नैसर्गिक न्यायतत्वाच्या आधारे वादींना त्याची बाजु मांडण्याची संधी मिळणे न्यायोचित आहे. मात्र वादींनी केलेला विलंब हा खर्चासह मंजूर होणेस पात्र आहे. सबब खालीलप्रमाणे आदेश,

**आदेश**

१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. वादी क्र. १ व २ यांनी प्रतिवादींना आजच्या अथवा पुढील तारखेस संयुक्तिक रक्कम रुपये २०० देणेच्या अटीवर वादींच्या विरुध्द झालेला विनाकैफियत आदेश रद्द करणेत येतो.

३. वादीनी यांनी खर्चाची रक्कम दिल्यानंतर प्रतिदाव्यावरील कैफियत त्वरीत दाखल करावी.

SHRUTI HANUMANTRAO PATIL

Digitally signed by SHRUTI HANUMANTRAO PATIL
Date: 2022.10.07 11:42:37 +0530

**दिनांक : ०६.१०.२०२२.**
**ठिकाण : देवरुख.**

**(श्रुती ह. पाटील)**
**सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,**
**देवरुख.**

**CERTIFICATE**

order in R.C.S. no. 19-2022

I affirm that the contents of this P.D.F. file are same, word to word, as per the original order/judgment/evidence.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | T. N. Khade (Jr. Clerk) |
| Court name | : | Jt. Civil Judge, J. D. and J.M.F.C., Deorukh. |
| Date | : | 06/10/2022 |
| Order signed by the presiding officer on | : | 06/10/2022 |
| Order uploaded on | : | 06/10/2022 |